# सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची रचना व सद्यःस्थिती यांची तोंडओळख

‘आरोग्य सेवांचे विकेंद्रित नियोजन’ या कोर्ससाठीचे मॉड्युल–२

साथी प्रकाशन

**S**upport for **A**dvocacy & **T**raining to **H**ealth **I**nitiatives

(Action Centre of Anusandhan Trust evolved from CEHAT)

# सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची रचना व सद्यःस्थिती यांची तोंडओळख

## 'आरोग्य सेवांचे विकेंद्रित नियोजन' या कोर्ससाठीचे मॉड्युल-२

**संकलन**

डॉ. योगेंद्र घोरपडे

**संपादन सहाय्य**

डॉ. अनंत फडके

साथी प्रकाशन

**S**upport for **A**dvocacy & **T**raining to **H**ealth **I**nitiatives

(Action Centre of Anusandhan Trust evolved from CEHAT)

• **संकलन-लेखन**

डॉ. योगेंद्र घोरपडे

**संपादन सहाय्य**

डॉ. अनंत फडके

• **प्रकाशक**

**साथी**

फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस, प्लॉट नं. १४०,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०२९
दूरध्वनी क्रमांक - २५४५१४१३, २५४५२३२५
ई-मेल :cehatpun@vsnl.com
वेब साईट : **www.**sathicehat.org

• **अर्थसहाय्य**

अलायन्स फॉर हेल्थ पॉलिसी ॲन्ड सिस्टीम रिसर्च, जागतिक आरोग्य संघटना (WHO)

Alliance for Health Policy and Systems Research

• **तांत्रिक सहाय्य**

डॉ. भुपिंदर कौर औलख

# प्रस्तावना

सार्वजनिक आरोग्य सेवांचे विकेंद्रित नियोजन अधिक परिणामकारक करण्यासाठी या प्रक्रियेची अधिकाधिक माहिती त्यात सहभागी घटकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने 'साथी' व 'SHSRC (राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र)' यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्य सेवांचे विकेंद्रित नियोजन' या कोर्सची सुरुवात करण्यात येत आहे. या कोर्समधील पहिल्या मॉड्युलमध्ये आपण हक्काधारित दृष्टिकोन, आरोग्य हक्क, समता, समानता तसेच लिंगभाव याबद्दल ओळख करून घेतली. कोर्सच्या या दुसऱ्या मॉड्युलमध्ये आपण आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत. आरोग्य यंत्रणा ह्या ढोबळमानाने दोन प्रकारच्या आहेत. सरकारी व खाजगी. आजच्या घडीला खाजगी आरोग्य क्षेत्राचे जाळे सर्वदूर पसरलेले आहे. बहुतांश लोकसंख्येचा ८० टक्के कल हा खाजगी आरोग्य क्षेत्राकडेच जास्त झुकलेला आहे. लोकांच्या आरोग्यासाठी कार्यरत या दोन क्षेत्रात मात्र कमालीचा फरक आपल्याला दिसतो. आरोग्य हा राज्याचा विषय असल्याने तसेच सार्वजनिक आरोग्यसेवा हा जनसामान्यांचा अधिकार असल्याने आपण सध्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची ओळख या मॉड्युलमध्ये करून घेणार आहोत.

आरोग्याचे विकेंद्रित नियोजन प्रभावीरित्या करण्यासाठी आपणास सध्याची आरोग्य व्यवस्था कशी आहे हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. या व्यवस्थेतील वेगवेगळ्या पातळ्यावरील यंत्रणा कशा काम करतात? त्याची व्याप्ती तसेच त्यांच्या मर्यादाची माहिती करून घेणे हे आपल्या क्षमता वाढवून घेण्यासाठी उपयोगी होतील अशी आम्हाला आशा आहे. गावपातळी ते जिल्हा पातळीपर्यंत कोणकोणते आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत? त्यांची कामे कोणती? व कोणत्या आरोग्य केंद्रात काय काय सेवा दिल्या जातात. इत्यादींची थोडक्यात माहिती देण्याचा प्रयत्न या मॉड्युलमध्ये करण्यात आला आहे.

काही विशिष्ट आजारांच्या नियंत्रणासाठी शासनातर्फे काही 'राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम' हाती घेण्यात आले आहेत. त्यांची अंमलबजावणी संपूर्ण देशात एकसारख्या प्रमाणात करण्यात येते. त्यामुळे अशा आजारांमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, तसेच त्याचा प्रतिबंध करण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे. अशा 'राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमा'च्या अंमलबजावणीसाठी मोठी यंत्रणा उभारावी लागते. तसेच त्यात प्रंचड प्रमाणात आर्थिक व मनुष्यबळ कामी लावावे लागते. आरोग्याचे विकेंद्रित नियोजन करतांना अशा राष्ट्रीय कार्यक्रमाची माहिती असणे आवश्यक आहे. अशा कार्यक्रमांच्या विविध पैलूंविषयी माहिती तसेच हे कार्यक्रम कितपत फायदेशीर आहेत व त्यात काय सुधारणा करायला हव्यात हे या मॉड्युलच्या दुसऱ्या भागात समाविष्ट आहे.

विकेंद्रित आरोग्याचे नियोजन यासाठी 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना'द्वारे प्रयत्न सुरू केला आहे. या अभियानाच्या माहितीचा समावेश या मॉड्युलच्या तिसऱ्या भागात केला आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांची गुणात्मकता वाढविण्यासाठी 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना'त अनेक तरतुदींचा समावेश केलेला आहे. या विशेष, तरतुदी, सोयी सुविधांचा ऊहापोह या मॉड्युलमध्ये करण्यात आला आहे.

एकंदरीत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची माहिती, त्याची व्याप्ती व मर्यादा, जाणून घेऊन स्थानिक पातळीवरील आरोग्य सेवांचे नियोजन कसे करावे याबाबत जाणून घेण्यास मॉड्युल - २ आपल्या उपयोगात येईल. अशी आम्हाला आशा आहे.

# अनुक्रमणिका


सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा थोडक्यात आढावा. ........................................... .........६

**प्रकरण १**- सार्वजनिक आरोग्य सेवांची रचना ........................................................ ९

**प्रकरण २**- सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील काही महत्त्वाच्या त्रुटी व त्यावर उपाययोजना........... १८

**प्रकरण ३**- राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम (संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण आणण्यासाठीचे कार्यक्रम : माहिती, त्रुटी तसेच प्रस्तावित उपाययोजना) ........................................................ २२

**प्रकरण ४**- राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम (प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम)................................... ३१

**प्रकरण ५**- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानः तोंडओळख ........................................... ३३

**प्रकरण ६**- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत महत्त्वाच्या योजना, तरतुदी व सेवांची हमी ... ३५

**प्रकरण ७**- राष्ट्रीय आरोग्य अभियान : उणिवा ..................................................... ४७

**प्रकरण ८**- सार्वजनिक आरोग्य सेवेचे विकेंद्रित नियोजन............................................. ५६